Estd. 1962
'A++' Accredited by NAAC (2021) With CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर

## परिपत्रक

08/2026

**विषय :– श्वानांच्या आक्रमक स्वभावाच्या अनुषंगाने प्रतिबंधात्मक वर्तन /चावल्यास प्रथमोपचाराच्या दृष्टीने घ्यावयाची काळजी.**

विद्यापीठातील सर्व अधिविभागप्रमुख, प्रशासकीय विभागप्रमुख, सर्व शिक्षक, प्रशासकीय कर्मचारी यांना आदेशान्वये कळविण्यात येते की, मा. सर्वोच्च न्यायालयाने भटक्या जनावरांमुळे मानवाच्या दैनंदिन जीवनात होणारा उपद्रव तसेच मानव.–श्वान संघर्ष टाळण्यासाठी सर्व शैक्षणिक संस्थामध्ये उपाययोजना करण्याचे निर्देश दिले आहेत. त्याअनुषंगाने विद्यापीठातील सर्व विद्यार्थी, शिक्षक, प्रशासकीय कर्मचारी यांना श्वानदंश झाल्यानंतर घ्यावयाच्या प्रथमोपचाराबदल माहिती असणे आवश्यक आहे.

श्वान (कुत्रा) किंवा तत्सम उष्ण रक्ताचे प्राणी (उदा. माकड, मांजर, ससा इ.) चावल्यास किंवा त्याने जखम केल्यास 'रेबीज" हा अतिगंभीर स्वरुपाचा विषाणूजन्य रोग होतो. या रोगावर कोणतेही औषध उपलब्ध नसुन वेळेत उपचार न घेतल्यास 100 टक्के मृत्यु ओढवतो.भारतात दरवर्षी सुमारे 18 ते 20 हजार इतके मृत्यु केवळ रेबीजमुळे होतात. त्यामुळे श्वान चावल्यास व त्याने जखम केल्यास ही बाब अत्यंत गांभीर्याने घेणे आवश्यक आहे. याप्रसंगी ताबडतोब हॉस्पिटलमध्ये जाऊन उपचार घेतल्यास रेबीजमुळे होणारा मृत्युदर कमी करता येईल.

### श्वान–दंश होऊ नये यासाठी घ्यावयाची काळजी व प्रतिबंधात्मक उपाय

1. **अनोळखी कुत्र्यांपासुन दूर रहा** –विद्यापीठ आवारात वावरताना कायम सतर्क रहा. रस्त्यावरील किंवा अनोळखी कुत्र्यांना विनाकारण त्रास देउ नका. ते खात असताना किंवा झोपलेले असताना त्याच्या जवळ जाऊ नका. जर एखादा कुत्रा जर तुमच्या मागे धावत आला, तर पळू नका, शांत उभे राहा किंवा हळुवारपणे मागे फिरा. पळाल्यामुळे कुत्र्याची शिकारीची प्रवृत्ती जागी होते.
2. विद्यापीठ आवारामधील एखादया भटक्या कुत्र्याचे वर्तन आक्रमक असल्याचे लक्षात आल्यास ताबडतोब याबाबत माहीती नोडल ऑफिसर किंवा सुरक्षा विभाग यांना दयावी.
3. **लसीकरण** – विद्यापीठ आवारातल्या निवास्थानामध्ये कुत्रे पाळले असल्यास त्याचे वेळेवर लसीकरण करुन घ्या.

कुत्रा चावला/त्याने जखम केल्यास घ्यावयाची काळजी व प्रथमोपचार

1. **जखम स्वच्छ धुणे** – कुत्रा चावल्यानंतरची पहिली 10 ते 15 मिनीटे अत्यंत महत्त्वाची असतात. जखम नळाच्या वाहत्या पाण्याखाली धरा, कोणताही साबण वापरुन जखम चांगली घासुन धुवा. साबणामुळे रेबीजचे विषाणू नष्ट होण्यास मदत होते.

2. **मलम किंवा बॅंडेज** –धुतल्यानंतर जखमेवर कोणतेही उपलब्ध **Antiseptic** (उदा डेटॉल, सॅव्हलॉन, किंवा पोवीडोन आयोडीन) लावावे. रेबीजचे विषाणु हवेच्या संपर्कात आल्यावर लवकर नष्ट होतात ,त्यामुळे जखम उघडीच ठेवावी. त्यावर घटट पटटी (Bandage) बांधु नये.

3. **डॉक्टरांचा सल्ला आणि लसीकरण** –

    1. जखम छोटी असो वा मोठी, ताबडतोब सरकारी रुगणालयांमध्ये श्वानदंश ओ. पी. डी. मध्ये जाऊन डॉक्टरांच्या सल्ल्याने उपचार घ्यावेत.
    2. श्वानदंश ओ. पी. डी. 24 तास चालु असते. व उपचार पुर्णपणे मोफत असतात.
    3. जितक्या लवकर उपचार चालु करता येतील तितके चांगले.
    4. डॉक्टरांच्या सल्याने **Anti-Rabies Vaccine** इंजेक्शन घ्यावे. कोणताही डोस चुकवु नये.
    5. डोस चुकला असल्यास जेव्हा लक्षात येईल तेव्हा ताबडतोब हॉस्पीटलमध्ये जाऊन लसीकरण पुर्ण करुन घ्यावे.
    6. गर्भवती महिला किंवा लहान बालक यांनाही श्वान चावल्यास लस घेणे बंधनकारक आहे.
    7. संपर्कात आलेला कुत्रा दहा दिवसात जिवंत असल्यास पुढील डोस घ्यावे लागत नाहीत. परंतु कुत्र्याचा ठावठिकाणा माहिती नसल्यास लसीकरणाचे पुर्ण वेळापत्रक पाळणे आवश्यक असते.

कुलसचिव

जा.कं. आस्थापना/ ९६
दि. 17 JAN 2026

प्रति,
1) सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक.
2) सर्व उपकुलसचिव, कायदा अधिकारी, जनसंपर्क अधिकारी, सहा. कुलसचिव व समकक्ष अधिकारी
3) मा. कुलगुरू, मा. प्र.कुलगुरू, मा. कुलसचिव, मा. संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ, मा. वित व लेखा अधिकारी यांचे कार्यालयास.
4) इंटरनेट विभाग – सदरचे परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.

विभागप्रमुख यांनी सदरचे परिपत्रक सर्व शिक्षक व सर्व प्रशासकीय सेवकांच्या निदर्शनास आणावे.